**संगीताची जादू अलगदपणे घडणाऱ्या या गानकोकिळेने आयुष्यात केवळ व केवळ संगीतच केले.**

प्राचार्या, वैशाली रमेश पाटील
शाह शिक्षण संस्था अध्यापक महाविद्यालय, शहाड कल्याण

# ०३ लतादीदींच्या स्वरातून प्रतिबिंबीत होणारे जीवन कौशल्य

लतादीदींचा स्वर शांत झाला, पण त्यांच्या आवाजाचा साज लाभलेले शब्द मात्र भारतभूमीवरील साऱ्या लेकरांच्या कानी घुमत आहेत,व राहतील........पिढ्यान् पिढ्या! जगभरातील अनेक मंचावर त्यांचे सूर निनादले; परंतु देशी, राष्ट्रीय भाषा जाणणाऱ्यांच्या हृदयावर कोरले गेलेले शब्द त्यांच्या गळ्यातून निखळताच आपल्या दुनियेत पेरले गेले, नाही का? लतादीदींनी सात दशके उधळलेल्या २५००० गीता पैकी कुठले गाणं, कुठले भान कोणाला देऊन गेले, ते आता आठवांच्या श्रद्धांजलीत फुलांसम वाहताहेत सारेच! साऱ्या भारतवर्षाला सुरेलपणा म्हणजे काय, हे आपल्या तरल, गोड आणि भावनांनी भरलेल्या आवाजाने समजावून सांगणारी गानसम्राज्ञी म्हणून लता मंगेशकर यांनी सात दशकाहून अधिक काळ केलेली अचाट, अफाट आणि समृद्ध कामगिरी ही या देशाची सांगीतिक क्षेत्रातील सगळ्यात मोठी खूण मानली गेली. दिवसातल्या प्रत्येक क्षणी स्वरसाथ करणारा त्यांचा स्वर सर्वांसाठी आश्वासक सोबतीचा ठरला. संगीताची ही जादू अलगदपणे पाखडणाऱ्या या गानकोकिळा ने आयुष्यात केवळ व केवळ संगीतच केले. त्यातील सगळ्या प्रकारच्या आव्हानांना समर्थपणे पेलले आणि काळाबरोबर राहण्याचा शर्यतीत दमछाक होत असतानाही आपली ऊर्जा टिकून ठेवली.तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या प्रचंड आव्हानांना तोंड देण्यासाठी आपले सारे आयुष्य पणाला लावणाऱ्या या गानसम्राज्ञी ने प्रत्येकाच्या जीवनात तेवत राहणारा एक सुरेल नंदादीप उजळवत ठेवला. वडील दीनानाथ यांच्याकडून मिळालेल्या अल्प काळातील शिक्षणानंतर त्यांनी अनेक दिग्गज गायकांकडून संगीताचे धडे घेतले. निसर्गत: तर हा कमालीचा सुरेल आवाजा नंतर या शिक्षणाने झालेले परिणाम त्यांच्या गायनातून सहज दिसतात. मात्र लतादीदींनी लक्षपूर्वक आणि कष्टपूर्वक संगीतातील प्रत्येक पायरीवर जिंकण्यासाठीच अतिशय सावधानतेने पाऊल ठेवले. एकेका गीताच्या ध्वनिमुद्रणासाठी अनेक दिवस घालून शेवटच्या प्रयत्नातही आपला स्वराभिनय तसूभरही कमी न होता ते प्रत्येक गीत म्हणजे स्वरांच्या इतिहासातील सुवर्णपानच व्हावे,ही जिद्द बाळगणाऱ्या लतादीदींना आजच्या कलावंतांच्या तुलनेत खूपच कष्ट घ्यावे लागले.



गायक आणि वादक यांनी एकत्रितपणे ध्वनिमुद्रण करताना त्यातील एकानेही जराशी चूक केली तर पुन्हा पहिल्यापासून ध्वनिमुद्रण करणे भाग पडत असे. अशावेळी न कंटाळता लतादीदींनी पुन्हापुन्हा जणू पहिल्यांदाच गात आहोत अशा उत्कंठतेने ते गीत, सादर करत. आजच्या ध्वनीमुद्रण तंत्रज्ञानात प्रत्येक सहभागी कलावंताला स्वतंत्रपणे गायन-वादन करता येते. त्यामुळे सगळ्याच कलावंतांना एकत्र येण्याची गरज नसते. शिवाय पुन्हा पुन्हा या ध्वनीमुद्रणन ही करावे लागत नाही. या तंत्रज्ञानामुळे गायनातील एखादा सूक्ष्मस्वर ही दुरुस्त करता येतो. ही अशी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नसतानाच्या काळात लतादीदींनी त्या तंत्रावर स्वार झाल्या आणि त्यावर विजय संपादन केला. हिंदी चित्रपटसृष्टीतच नव्हे, तर सारा देश लता मंगेशकरांच्या जादुई कंठाने मंत्रमुग्ध झाला त्या सुवर्णयुगातील सगळ्या प्रतिभावंत संगीतकारांच्या मनातले गाणे लतादीदीं आपल्या गळ्यातून लीलया सादर करत होत्या. त्यामध्ये स्वतःच्या प्रतिभेने भरही घालत होत्या. त्या सगळ्यांसाठी लतादीदींचे असणे हेच फार आश्वासक होते. त्यांच्या मनातला हा विश्वास लतादीदींनी सार्थ करून दाखवला. लतादीदींना संगीतकारांच्या मनातले संगीत अचूक ओळखता येत होते. याचे कारण त्या स्वतः प्रतिभावान संगीतकार होत्या.

शब्दांना स्वरांचे पंख लावून त्यांना उंच आकाशात विहार करायला लावणाऱ्या संगीतकारांची परीक्षा गीतानंतर सुरू होत असे. गीताला एक सहजपणे चिकटलेले स्वर दुनियेचे अस्तर असते. ते शोधू शकणारा संगीतकार त्या गीताला सहज न्याय देऊ शकतो. परंतु प्रत्येक वेळा संगीतकारांच्या मनात कुठलीतरी धुन तयार होत असते. तिला योग्य शब्दांची आणि कथानकाची वाट पहात बसावी लागते. लतादीदींना प्रत्येक संगीतकारांच्या सगळ्या खाणाखुणा पक्क्या माहीत होत्या. प्रत्येकाच्या संगीताची आपल्याकडून नेमकी काय अपेक्षा आहे, याची अतिशय स्पष्ट जाणीव त्यांना होती. त्यामुळे सुवर्णकाळातील प्रत्येक संगीतकाराला ही कलावती फक्त आपल्याच गीताला अतिशय सौंदर्यपूर्ण बनवू शकते, असे वाटत असे. लतादीदींचे वेगळेपण असे की, प्रत्येक गीतातील प्रत्येक शब्दाला समजावून घेत, त्यांच्या उच्चारा कडे बारकाईने लक्ष देत,त्यातील भाव शोधत ते स्वरांच्या सहाय्याने पोहोचण्यासाठी त्यांच्याकडे कमालीची प्रतिभा होती.केवळ आवाज सुरेल आहे, एवढ्या भांडवलावर चित्रपटांच्या रूपेरी दुनियेत कोणीच कलावंत इतक्या उंचीवर पोहोचू शकत नाही. त्यांचा आवाज केवळ सुरेल होता असे नाही, तर त्याच्या आवाजातील कमालीचा लवचिकपणा प्रत्येक संगीतकारांसाठी हवाहवासा होता. या शब्द संगीताला लतादीदीनी भारतीय संगीताच्या क्षेत्रात फार उंचीचे स्थान मिळवून दिले.केवळ चित्रपटांसाठी गायचे अशी भूमिका त्यांनी कधीच घेतली नाही. भावगीते, भक्तिगीते, अभंग, लावणी अशा कितीतरी प्रकारांमध्ये लतादीदींनी आपली कामगिरी केली. अल्बम या संकल्पनेचा उगम होण्यापूर्वी ही लतादीदींनी अशा अनेक ध्वनिमुद्रिकासाठी काम केले.

नादयुक्त गायन, वादन आणि नृत्य यांच्या तिहेरी संगमाला संगीत असे म्हणतात. संगीत हे सर्वांनी ऐकले पाहिजे कारण, संगीत हे प्रत्येकासाठी वेगवेगळ्या प्रकारात उपलब्ध आहे. संगीत ऐकल्याने आपले मन अगदी प्रसन्न होते. संगीत माणसाला मानसिक स्वास्थ प्रदान करण्याचे माध्यम आहे. 'सं' म्हणजे स्वर, 'गी' म्हणजे गीत आणि 'त' म्हणजे ताल होय.संगीत कला ही सर्व कलामध्ये श्रेष्ठ कला मानली जाते. संगीतामधून आपण आपले भावना व्यक्त करू शकतो. जेव्हा आपण आनंदीत असतो तेव्हा



Scanned with OKEN Scanner

संगीतातला शब्द आपल्याला समजतो पण जेव्हा आपण दुखात असतो तेव्हा त्या संगीतातल्या शब्दाचा अर्थ समजतो. संगीत हे ईश्वराने दिलेली एक देन आहे. आपल्या मनातील भावना ही या देशाची सांगीतिक क्षेत्रातील सगळ्यात मोठी खूण मानली गेली. संगीत आयुष्याला प्रेरणा देते.एकांतात स्वतःला ओळखण्यासाठीचा एकमेव मार्ग म्हणजे संगीत होय. याच संगीतातील मानवी जीवनातील साऱ्या भावना लतादीदींच्या गीतांमधून प्रतिबिंबित झाल्या. आपल्या देशाला लाभलेला खजिना म्हणजे लतादीदी त्यांच्या आवाजाने आपल्या सगळ्यांचे आयुष्य उजळून टाकले आहे. सर्वांना सुखात आणि दुःखात त्यांच्या गाण्यांनी मोठा आधार दिला. लतादीदींची शुभ्रधवल साडी, त्यावर नाजूक नक्षीकाम, दोन वेण्या पाठीवर सोडलेल्या, चेहऱ्यावरील भाव कमालीचा हसरा, दोन भुवयांच्या संगमावर कसलासा अंगारा लावलेला. एक भुवई आक्रसत, खळाळून हसत पदर सारखा करत, उजव्या पायाचा पाऊल वर उचलून पुढे झोका देत, माईक पुढे स्थिरावणाऱ्या आणि सुरांत शब्द प्रकटत असत. लतादीदींना भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार, महाराष्ट्र भूषण पुरस्कार, तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, फ्रान्स सरकारचा प्लीज ऑफ ऑनर,यासारखे अनेक महत्त्वाच्या पुरस्कारांनी सन्मानित केले होते. आचार्य प्र. के. अत्रे यांनी तर खालील वाक्यातून त्यांचा फार मोठा सन्मान केलेला होता, स्वर्गीय स्वर माधुर्याच्या या इहलोकातील मूर्तिमंत अवतार असलेल्या लता च्या वाढदिवसानिमित्त तिला केवळ लोखंडाच्या निफातून उतरलेल्या शाईच्या शब्दांनी वृत्तपत्राच्या जाड्याभरड्या कागदावर अभिवादन करणे म्हणजे एखाद्या अप्सरे च्या स्वागतासाठी तिच्या मृदूचरण कमलाखाली जाड्याभरड्या गोणपाठाच्या पायघड्या अंथरण्याइतके विशोभित आहे. लताच्या कंठातील अलौकिक कोमलतेला साजेसे अभिवादन तिच्या जीवनातील या शुभदिनी करायचे असेल, तर त्यासाठी प्रभातकाळची सूर्यकिरणे दवबिंदुमध्ये भिजवून बनलेल्या शाईने, कमलतंतूच्या लेखणीने लिहिलेले मानपत्रच गुलाब कळीच्या करंडकातून तिला अर्पण करायला हवे.

(मराठा २८ सप्टेंबर१९६४)

प्रत्येकाला लतादीदींचा स्वर मोहून टाकतो. लतादीदींच्या गाण्याच्या स्वरातून प्रत्येकाला जीवन कसे कौशल्याने जगावे याचे ज्ञान होत असते. कौशल्ये अनुकूल आणि सकारात्मक वर्तनासाठी क्षमता आहेत जी मानवांना जीवनातील अडचणी व आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम करते.

जगभरातल्या जवळजवळ सर्व देशांच्या संस्कृतींचा संगीत हा अविभाज्य भाग आहे. धार्मिक विधी, उत्सव व समारंभ, नृत्य, नाटक, चित्रपट, कथनादी कार्यक्रम, विशिष्ट व्यायामप्रकार, जादूच्या खेळासारखे रंजनप्रकार असे अनेकविध सांस्कृतिक आविष्कार संगीताची जोड देऊन सादर केले जातात व ह्या संगीतसाथीने त्यांच्या आस्वादयतेत व प्रभावात भरच पडते. कमी-अधिक फरकाने सर्वच संस्कृतींमध्ये हे दिसून येते. शालेय-महाविद्यालयीन शिक्षणक्रमांत संस्कृतीच्या विविध अंगो-पांगांचा अभ्यास केला जातो, त्यामुळे त्यात संगीतशिक्षणाला महत्त्व प्राप्त होणे स्वाभाविकच ठरते. संगीत ही मुख्यत्वे ऐकून शिकण्याची, श्राव्य स्वरूपाची विदया असल्याने, त्याच्या अध्ययन-प्रकियेत निष्ठापूर्वक श्रवण-भक्तीला अनन्यसाधारण महत्त्व येते. संगीततज्ज्ञांच्या, गुरूंच्या पत्यक्ष मार्गदर्शनाबरोबरच, विसाव्या शतकातील इलेक्ट्रॉनिक क्रांतीमुळे उपलब्ध झालेल्या तांत्रिक साधन-सुविधांचाही (उदा., रेडिओ, ध्वनिमुद्रिका, फीत मुद्रक, रेकॉर्डप्लेअर, दूरदर्शन, व्ही. सी.आर., सी.डी. वगैरे) संगीत-शिक्षणाच्या प्रकियेत मोठाच हातभार लागला आहे. आधुनिक काळात घरोघरी व्यक्तिव्यक्तीगणिक संगीत पोहोचविण्याच्या ह्या तांत्रिक साधनांच्या क्षमतेमुळे समाजात संगीत-साक्षरता, जाण व अभिरूची वृद्धिंगत करण्याचे कार्य मोठया प्रमाणावर घडत आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने १९९९ मध्ये पुढील दहा जीवन कौशल्यांचा पुरस्कार केला :

लतादीदींनी नव्या पिढीचे गाणे संस्कारित केले आहे आणि सामान्य माणसाची संगीतविषयक अभिरुची आणि जीवन घडवण्याचे कौशल्य यामध्ये त्यांचा फार मोठा



Scanned with OKEN Scanner

हातभार लावला आहे. लतादीदींच्या गाण्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या स्वरांचा निर्मळपणा आणि निरागस पणा हा व्यक्तीच्या जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण करतो व व्यक्तीच्या जीवनाला नवी कलाटणी देतो. लतादीदींच्या संगीतामुळे चांगल्या स्वरावली लोक प्रत्यही ऐकताहेत. संगीताच्या निरनिराळ्या प्रकारांची त्यांचा परिचय होत आहे. त्यामुळे लोकांचे स्वरज्ञान वाढले आहे. तशीच सुरेलपणाची चांगली समजही त्यांना आली आहे. लयीचेही निरनिराळे प्रकार त्यांना समजू लागले आहेत आणि आकारयुक्त लई ची त्यांना जाणीव झाली आहे.

स्वरसम्राज्ञी गानकोकिळा लतादीदी मंगेशकर यांच्या गाण्यातील स्वरातून खालील प्रमाणे जीवन कौशल्य प्रतिबिंबित होतात.

लता दीदींच्या आवाजातील भूपाळी
उठा उठा हो सकळीक, वाचे स्मरावा गजमुख
रिद्धी सिद्धी चा नायक, सुखदायक भक्तांसी
अंगी शेंदुराची उटी, माथा शोभतसे किरीटी
केशर कस्तुरी लल्लाटी, हर कंठी साजिरा
कानी कुंडलाची प्रभा, सूर्य चंद्र जैसे नभा
माजी नाग बंदी शोभा, स्मरता उभा जवळी तो

यातून व्यक्तीच्या जीवनाची सकाळची सुरुवात पवित्र व मंगल होत असते. हा मराठी पारंपरिक संगीतप्रकार आहे. देवाला पहाटे जागे करण्यासाठी भूपाळी गाण्याची महाराष्ट्रात सांस्कृतिक परंपरा आहे. सहसा भुपाळ्या भूप रागात बांधलेल्या असतात. रात्रीचा अंतिम प्रहर व दिवसाचा पहिला प्रहर या दरम्यानच्या काळामध्ये सृष्टी निर्माता पालनकर्त्याला भूप रागामध्ये पद्य स्वरूपातील स्तुतीची आळवणी करून जगविले जाते. दिवसाची अशी सुंदर सुरुवात लतादीदींच्या स्वरातुन होते. मन प्रसन्न होते.मन मंगल आणि पवित्र होऊन जाते. लता मंगेशकरांनी ३६ भाषांतली ३० हजारांच्या वर गाणी गायली.

दिवसाच्या प्रत्येक कृतीत लता दीदींचा स्वर सोबत असे, ए मालिक तेरे बंदे हम! प्रार्थना असो की सुखकर्ता दुःखहर्ता ही आरती असो, देवासमोर गायली जाणारी स्तुतीसुमने तर अगदीच मंत्रमुग्ध करणारे, सुंदर ते ध्यान उभे विटेवर लतादीदींच्या स्वरात भावनांचे समायोजन व ताणतणावांचे समायोजन या जीवन कौशल्याचा अंतर्भाव झालेला दिसून येतो. परत रात्री झोपताना अंगाई तर लतादीदींची हवीच..... धीरे से आजा रे अखियन में निन्दिया आ जा रे आ जा हे गीत ऐकून आजही डोळे जड होतात. या अंगाई गीतातून चिकित्सक विचार प्रक्रिया, आंतर व्यक्ती संबंध भावनांचे समायोजन व ताणतणावांचे समायोजन अशा विविध जीवन कौशल्यांचा अंतर्भाव झालेला दिसून येतो.

'दिल अपना और प्रीत पराई' या सिनेमातील लतादीदींनी स्वरबद्ध केलेले,

अजीब दासता है ये कहा शुरु कहा खतम
ये मंजिले है कोनसी न वो समझ सके न हम

तसेच आरजू (१९६५)मधील सिनेमातील गायलेलं

बेदर्दी बालमा तुझको
मेरा मन याद करता है
बेदर्दी बालमा तुझको
मेरा मन याद करता है
बरसता है जो आखो से

वो सावन याद करता है या गाण्यातून स्व जी जाणीव व समानानुभूती हे जीवन कौशल्य प्रतिबिंबित झालेले दिसते म्हणजेच एखादी व्यक्ती ही आपणाशी निगडित असो अथवा नसो तिच्या ठिकाणी आपण आहोत असे समजून तिच्या सुखदुःखांची समरस होउन तिला जाणून घेणे म्हणजे समान अनुभूती होय. तसेच निर्णय क्षमता व स्व जागृती हे जीवन कौशल्य या गाण्यातून आलेले दिसून येते.

मुंबई – ए मेरे वतन के लोगों
जरा आंख में भर लो पानी
जो शहीद हुए हैं उनकी
जरा याद करो कुर्बानी

या गाण्याच्या चार ओळी ऐकल्या की अंगावर रोमांच



Scanned with OKEN Scanner

उभे राहतात. देशातल्या प्रत्येक नागरिकाच्या मनात देशभक्तीचा अंगार फुलतो. या गीतातून आंतरव्यक्ती संबंध, भावनांचे समायोजन व स्व जागृती या जीवन कौशल्यांचा विकास होताना दिसून येत आहे.

तारुण्यातील तरल प्रेमभावना तर लतादीदी शिवाय व्यक्त करणे शक्य तरी आहे काय ! श्रीं ४२० (१९५५) या सिनेमातीलप्यार हुआ इकरार हुआ, प्यार से फिर क्यों डरता है दिल त्यानंतर कधी सो कॉल्ड प्रेमभंगालाही सामोरे जावे लागते, त्या स्थितीतही कटी पतंग (१९७०) या सिनेमातील, या ओळी व्यक्तीच्या जीवनातील मर्म सांगून जातात.

ना कोई उमंग हैं, ना कोई तरंग हैं
मेरी ज़िंदगी हैं क्या
एक कटी पतंग हैं
ना कोई उमंग हैं
ना कोई तरंग हैं
मेरी ज़िंदगी हैं क्या
एक कटी पतंग हैं
ना कोई उमंग हैं
आकाश से गिरी में
यह बार कट के ऐसे
आकाश से गिरी में
यह बार कट के ऐसे
दुनिया ने फिर ना पूछो
दुनिया ने फिर ना पूछो
लूटा हैं मुझ को कैसे
ना किसी का साथ हैं
ना किसी का संग हैं
मेरी ज़िंदगी हैं क्या
एक कटी पतंग हैं
ना कोई उमंग हैं ना
कोई तरंग हैं

है ना कोई तरंग हे म्हणत लतादीदींच्या या गाण्यातील स्वरातून व्यक्तीच्या जीवनातील समस्या कशा व किती आहेत हे समजते. यातून समस्या निराकरण करणे गरजेचे आहे.या स्वरातून व्यक्तीची जीवनाबद्दलची निराशा समजून येते. व्यक्तीला स्व जागृतीआणि समनानुभुति जी जाणीव होते. जेव्हा व्यक्ती नैराश्य, तणावसारख्या आजारांना सामोरे जातो, तेव्हा त्यातून बाहेर पडण्यासाठी संगीत मुख्य भूमिका पार पाडत असते. प्रत्येक सुख, दुःखाच्या क्षणी आपल्याला संगीत यथोचित साथ देत असते. जन्मापासून ते अगदी मृत्यूपर्यंत मानवासोबत संगीत असतेच. जीवनातला खरा सोबती संगीत आहे, असे म्हणायला काही हरकत नाही.

लता मंगेशकर म्हणजे संगीत व भारताचा अनमोल ठेवा. एखाद दुसऱ्या गाण्यांमुळे काही गायीका प्रकाशझोतात येतात तर काही आवाज असे असतात की त्या आवाजामुळे ते गाणं लोकप्रिय होतं. तसाच प्रकार लताजींच्या बाबतीत झाला आहे. त्यांच्या अवीट गोडीच्या आवाजामुळे बरीचशी गाणी आजही लोकप्रियतेच्या शिखरावर टिकून आहे.

ए मालिक तेरे बंदे हमऐसे हो हमारे करम
नेकी पर चले और बदी से टले,

ताकी हँसते हुये निकले दम लताजींनी गायलेली प्रार्थना म्हणजे नैतिकता, श्रध्दा व तत्त्वज्ञानाचे उत्तम उदाहरण. जेव्हा या संकल्पना एखाद्या अधिकारी व्यक्तीच्या तोंडून आपण ऐकतो तेव्हा त्या आयुष्याच्या खडतर वाटचालीवर खूप प्रेरणादायी ठरतात. या प्रार्थनेतून आपणास व्यक्ती व्यक्ती मधील संबंध, परिणाम कारकसंप्रेषण व भावनांचे समायोजन घडून आलेले दिसते.

लता दीदींनी गायलेली मराठी गाणी...- गजानना श्री गणराया- चिंब पावसानं रान झालं आबादानी- ऐरणीच्या देवा तुला- आज गोकुळात रंग खेळतो हरी- लटपट लटपट तुझे चालणे- मोगरा फुलला- मी रात टाकली- मेंदीच्या पानावर- चाफा बोलेना यागाण्यांमुळे चित्रपट सृष्टीत अधिक लोकप्रियता मिळवली.देवाला गवसणी घालण्या पासून ते व्यक्तीच्या जीवनातील दुःख आनंद या

भावनांना वाट मोकळी करून देण्याचे कौशल्य या स्वरातून स्वरबद्ध झालेले आपणास दिसून येते. १९५० च्या दशकात लतादीदी नी ज्या संगीत दिग्दर्शकांनी स्वरबद्ध केलेली गाणी गायिली, लताजी नी नौशादांसाठी गायिलेले पहिले गाणे हे जी. एम.दुर्राणींसोबतचे द्वंद्वगीत छोरेकी जात बडी बेवफ़ा आहे. सुप्रसिद्ध संगीतकार जोडी शंकर-जयकिशन यांनी तर आपल्या जवळजवळ सर्व चित्रपटांच्या (विशेषतः राज कपूरनिर्मित) गाण्यांच्या गायिका म्हणून लताजीचीच निवड केली.१९६०च्या दशकात लता मंगेशकर निर्विवादपणे हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रथम श्रेणीच्या पार्श्वगायिका ठरल्या. ह्या काळात लतादीदी नी जवळजवळ सर्व संगीतकारांबरोबर गाणी ध्वनिमुद्रित केली. त्यांपैकी असंख्य गाणी अजरामर झाली. १९६० मध्ये प्यार किया तो डरना क्या हे चित्रित गाणे तुफान लोकप्रिय झाले. हवाई-धरतीचे अजीब दास्ताँ है ये हे शंकर-जयकिशन दिग्दर्शित आणि दिल अपना प्रीत पराई (इ.स. १९६०) मध्ये मीना कुमारी वर चित्रित गाणेही अतिशय प्रसिद्ध झाले. या गाण्यातील स्वरा मधून इतरांबद्दल कोणत्याही प्रकारे द्वेष, मत्सर, दूषित विचार मनात न बाळगता त्यांच्याबद्दल आदर, प्रेम, सहानुभूती बाळगून समाजहिताची वृत्ती निर्माण होण्यास तसेच एकमेकांप्रती वैयक्तिक व सामाजिक संबंध निकोप ठेवण्यास प्रवृत होण्याची आकांक्षा दिसून येते. तेरे बिना जिंदगी से कोई शिकवा तो नही, लग जा गले, अजीब दास्ता है ये कहा शुरु कहा खतम, एक प्यार का नगमा है, रंगीला रे, तुझसे नाराज नही है जिंदगी, नैना बरसे लता दीदींच्या या सदाबहार सुपरहिट गाण्यातून जीवनाकडे बघण्याचा आपला दृष्टिकोनच बदलून जातो व सकारात्मक होतो. जीवन किती सुंदर आहे ते आयुष्यात एकदाच मिळते व किती आनंदाने जगावे हे आपणास या स्वरबद्ध केलेल्या गीतातून समजते. या सर्व स्वर रचनेतून आपणास स्व जागृती, निर्णयक्षमता, चिकित्सक विचारक्षमता, समानानुभूती, परिणामकारक संप्रेषण अशा विविध जीवन कौशल्यांचा प्रगलभतेने विचार झालेला दिसून येतो. आपल्या सबंध कारकिर्दीत आजतागायत लतादिदींनी १००० पेक्षा जास्त हिंदी चित्रपटांमध्ये व जवळजवळ ३६ पेक्षा जास्त प्रादेशिक भाषामंध्ये गाणी गायली आहेत. या सोबतच लतादिदींनी अनेक विदेशी भाषामध्ये देखील गायन केलेलं आहे. संगीताच्या या महानायिकेने सर्वात जास्त गाणी मराठी आणि हिंदी भाषामध्ये गायिली आहेत.

लतादीदींची गाणी व्यक्तीच्या आयुष्यात संगीत थेरपीचे कार्य करते. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात म्युझिक थेरपी एक वरदानच ठरत आहे. मनावर साठलेलं मळभ दूर सारत, अंगातील आळस झटकत आपल्याला एकदम ताजेतवाने करणारे सोल्युशन म्हणजे दुसरं तिसरं काही नसून ते आहे 'संगीत थेरपी' या थेरपीसाठी आपल्याला कुठं जायची गरज नाही, कुणाला भेटायची गरज नाही, इतकच काय मूड चांगला होईपर्यंत अगदी जाग्यावरुन हलण्याचीही गरज नाही. लता दीदी ची गाणी आपल्याला नेट वर सहज उपलब्ध होतात ती ऐकली की जीवनातील नैराश्य दूर होते. लहानांपासून जेष्ठांपर्यंत सर्वच वयोगटात भेडसावणारी समस्या म्हणजे निद्रानाश होय. या समस्येचा त्रास असलेल्या व्यक्तीने गानसम्राज्ञी लता जी चे सुमधूर असे संगीत ऐकल्यास त्याला चांगल्या प्रकारची झोप लागण्यासही मदत होते. तज्ज्ञांच्या मते संगीत थेरपी ही मानवी जीवनात उपयुक्त ठरणारी सर्वात प्रभावशाली थेरपी आहे. संगीत ऐकल्यामुळे अल्झायमर, डिमेंशिया, व्याकूळता, आक्रमकता, स्मृतिभ्रंश आणि इतर मानसिक आरोग्य स्थितींमध्ये आराम मिळू शकते. विशेष म्हणजे व्यक्तीचा कामातील उत्साह टिकवून ठेवण्यासाठी तसेच बुद्धीला चालना देण्याचे कामही संगीत थेरपीमधून मिळत असते. संगीतातील सूर आणि शब्द आपल्या मेंदूतील डोपामाईन या आनंदलहरी निर्माण करणाऱ्या हार्मोनच्या निर्मितीला उत्तेजना देत असल्याने मनोकायिक विकारांमध्ये त्याचा सकारात्मक उपयोग होतो. अशा लतादीदी या गाण्याच्या माध्यमातून कालही होत्या आजही आहेत आणि पुढेही राहतील...

या स्वरमाऊलीला भावपूर्ण श्रद्धांजली

आता विसाव्याचे क्षण माझे सोनियाचे मनी...



Scanned with OKEN Scanner

ISSN : 0976-0636

R.N.I.Regd.No.MAHMUL/2009/41031

सर्वव्यापी, सर्वकालीन शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी बांधीलकी असलेले मासिक

# शिक्षण तरंग

UGC APPROVED

# Shikshan Tarang

बहुभाषिक (मराठी, हिंदी व इंग्रजी)

अकांची किंमत : रु. ६० (संस्थांसाठी) रु. ५० (वैयक्तिक)

Broad Subject Category: Social Science

Subject : Education Multidisciplinary

Vol.: 13th | Issue : 6th & 7th

Month : 5 February and March 2022

# आदरांजली

फेब्रुवारी-मार्च

विशेषांक २०२२



## सामाजिक संवेदनांचे

## स्वर्गीय स्वर

भारतरत्न गान साम्राज्ञी

## लता मंगेशकर

इनसाईट पब्लिकेशन्स, नाशिक

संपादक: डॉ. किशोर चव्हाण

व्यवस्थापकीय संपादक: प्रा. अनघा चव्हाण-काळे

कार्यकारी संपादक: प्रा. डॉ. गिता शिंदे

Scanned with OKEN Scanner